# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसूचनाक्रमांक २००७/(३२२/०७)विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४(१९९४ चा महा.३५) च्या कलम ३ च्या पोटकलम(२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

## (वित्त व लेखा विभाग)

एम. आय. डी. सी. रोड, कॉम्पलेक्स, गडचिरोली जि. गडचिरोली ४४२६०५

जा.क्र. गो.वि./अंकेक्षण/ ४९२८ /२०२६ दि. २० /०२/२०२६

# परिपत्रक

**संदर्भ :- जा.क्र. गो.वि./अंकेक्षण/३९९०/२०२५ दि. ०४/१२/२०२५**

सर्व संलग्नित महाविद्यालयाचे मा. प्राचार्य, परीक्षा केंद्राचे केंद्राधिकारी, सहकेंद्राधिकारी व संकलन केंद्र प्रमुख तसेच संबंधितांना या परीपत्रकाद्वारे सुचित करण्यात येते की, विद्यापीठाच्या उन्हाळी तसेच हिवाळी लेखी परीक्षा विविध परीक्षा केंद्रावर होत असतात. सदर परीक्षा केंद्रांना परीक्षेचा खर्च भागविण्यासाठी अग्रिम देण्यात येत असते परंतु असे निदर्शनास येते की बऱ्याच परीक्षा केंद्र असलेल्या महाविद्यालयांकडुन अग्रिम समायोजनाचे हिशोब विहित कालावधीत सादर करण्यात येत नाही त्यामुळे बऱ्याच महाविद्यालयांचे अग्रिम थकीत असल्याचे दिसून येते. त्यामुळे उन्हाळी - २०२५ व हिवाळी - २०२५ परीक्षा केंद्र असलेल्या सर्व महाविद्यालयांनी दिनांक २५/०२/२०२६ पर्यंत अग्रिम समायोजनाचा हिशोब विद्यापीठात सादर करावा अन्यथा आपणास कसल्याही प्रकारचे विद्यापीठाकडुन नादेय प्रमाणपत्र देण्यात येणार नाही तसेच पुढील परीक्षेकरीता अग्रिम देण्यात येणार नाही याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

13/2/2026

**(सी. ए., भाष्कर पठारे)**
**वित्त व लेखा अधिकारी**
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी :-

१. मा. कुलगुरू महोदय यांचे कार्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस सविनय सादर.
२. मा. प्र - कुलगुरु महोदय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस सविनय सादर.
३. मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस सविनय सादर
४. मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांना माहितीस तसेच कार्यवाहीस सविनय सादर
५. संगणक विभाग सदर परीपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळवार प्रसिध्द करण्याची कार्यवाही घ्यावी.